वाचन
७६३३

# नाट्यछटा

[redacted]
राजाराम पुरु[redacted]

कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणें.

# नाट्य छटा

श्री. ब्र. दं. आठले, भांडागारगृह शाखा.
दा. क्र. ५६३३ मो दि ...........
वि. ...९१... क्र. ..................

लेखक
राजाराम पुरुषोत्तम सगदेव
एम्. ए., एल्एल्. बी.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे
३०,०९...
अनुक्रम
विभाग ...
क्रमांक ...२२६
नों. दि. ...
वाचनालय

कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणें.

सर्व हक्क लेखकाचे स्वाधी

प्रथमावृत्ति : १९५९

किंमत : दीड रुपया

* * *

प्रकाशक: अ. अं. कुलकर्णी, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, टिळक रोड, पुणे २.

मुद्रक: दा. त्र्यं. जोशी, व्यवस्थापक, चित्रशाळा प्रेस, सदाशिव, पुणे २.

प्रिय तात्यासाहेब,

तुम्हीं लिहिलेल्या नाट्य-छटांचा छोटासा संग्रह वाचला. तुमचं अभिनंदन करण्यासाठी मी हें छोटसं पत्र लिहीत आहें. तुमच्या या पुस्तकाला मीं प्रस्तावना लिहावी अशी तुमची इच्छा. एकदा मनांत आलं, 'काय, पाहिजेच म्हणतां प्रस्तावना ?' अशा मथळ्याची एक छोटी नाट्य-छटाच लिहून धाडावी. परंतु पुन्हा विचार केला, की नाट्य-छटा म्हटली की, थोडा का होईना उपहासगर्भ विनोद येणारच, आणि तुम्ही स्वतः जरी तो योग्य अर्थानं घेतलांत तरी इतर कुणाला कदाचित् वाटेल की तुमच्या लिहिण्याची मी थट्टा करतों आहें. तेव्हा जी गोष्ट मला अभिप्रेत नाही, तिचा थोडासा तरी संभव कशाला ठेवायचा, या विचारानं तुम्हाला हें पत्र लिहीत आहें. याचा प्रस्तावनेदाखल उपयोग करावासा वाटला तर करा.

विदर्भ साहित्य-संघाचे तुम्ही एक निष्ठावंत कार्यकर्ते आहांत. कार्याची तळमळ, संघाविषयी भक्ति, निरलसपणा, हे तुमचे गुण संघाच्या कार्यास किती उपयुक्त ठरले आहेत तें सर्वांना माहीत आहे. परंतु जो प्रत्यक्ष लेखन करतो तोच साहित्यिक या काटेकोर व्याख्येच्या चौकटींत अजून तुम्ही बसलां नव्हतां. तुमच्या या पहिल्या पुस्तकानं तुम्ही आता राजरोस साहित्यिक म्हणून मिरवूं शकाल याचा तुम्हांलाच नव्हे तर माझ्यासारख्या तुमच्या मित्रांनाहि आनंद वाटेल.

नाट्य-छटेची फॅशन सुमारें पंचवीस वर्षांपूर्वी फार जोरांत होती. आता ती लाट अजिबात ओसरल्यासारखी दिसते. याचं कारण उघड आहे. हा वाङ्मयप्रकार सोपा तर आहेच, परंतु त्याच्या सोपेपणामुळेच तो थोडासा बालिशहि आहे. फार पूर्वी हरिभाऊ आपट्यांच्या 'करमणूक' पत्रांत 'कर्टन लेक्चर्स' वाचल्याचं मला आठवतं. त्याच वाङ्मयप्रकाराचं पुढे नाट्यछटेंत रूपांतर झालं असं म्हणतां येईल. एक नवीन वाङ्मयप्रकार म्हणून, समाजांतील व्यक्तींचा ढोंगीबाजपणा उघड करण्याची यांत सोय आहे म्हणून, आणि विशेषतः याची प्रकृति विनोदी आहे म्हणून, या वाङ्मय-प्रकाराचं मराठी वाचकांनी कौतुक केलं. परंतु लोकाना लौकरच कळून चुकलं, की त्या वाङ्मय-प्रकारांत साहित्यिक गुणांची कांही विशेष

कसोटी लागत नाहीं. माणसाच्या वागण्यांत पदोपदीं जी विसंगति आढळते ती टिपण्याचं कौशल्य, आणि उलट सुलट कल्पना एकत्र गुंफण्याची शैली, एवढ्या भांडवलावर नाट्यछटेची निर्मिति करतां येते. मराठी नाट्यछटेचे आद्य जनक अशी ज्यांना पदवी देण्यांत येते त्या दिवाकरांच्या ठिकाणीं देखील यापेक्षा अधिक कांही भांडवल होतं असं मला वाटत नाही. नाट्य-छटेच्या सोपेपणामुळेच. तिच्या निर्मितीला कांही काल ऊत आला होता; आणि त्या सोपेपणामुळेच तिची निर्मिति संपली. नाट्य-छटाकार म्हणून दिवाकरांचं नांव आज थोडंफार रेंगाळत आहे तें देखील त्यांच्या वैयक्तिक चाहत्यांचा एक विशिष्ट गट त्याबद्दल काळजी घेत आहे म्हणून. बाकी कुणी नाट्य-छटाकार आज नांवाला देखील उरलेले नाहीत.

परंतु तात्यासाहेब, मला माहीत आहे की, साहित्यांत अजरामर कीर्ति मिळविण्याच्या हेतूनं या छोट्या पुस्तकाचं लेखन तुम्हीं केलेलं नाही. तुमचा हेतु अगदी नम्र आहे. साहित्यिकांच्या मेळाव्यांत आपण अगदीच विशोभित दिसूं नये एवढीच तुमची इच्छा. या इच्छेला अनुसरून तुम्ही नाट्य-छटेचा सोपा प्रकार हाताळलांत हें योग्यच केलंत.

नव्यानं लेखन करूं पाहणाऱ्या माणसाला या प्रकाराचा सरावासाठी खचितच उपयोग होण्यासारखा आहे. शिवाय मला जरी तुमचा प्रत्यक्ष सहवास अल्प प्रमाणांत मिळाला असला तरी तुमची विनोद-बुद्धि आणि समयसूचक चतुर विनोदी बोलणं या तुमच्या अंगच्या दोन्ही गुणांचा मला परिचय झालेला आहे. कांही वर्षांपूर्वी मी व्याख्यानानिमित्त नागपुरास आलों असतांना माझ्यासाठी तुम्ही सुंदर मेजवानी दिलीत, त्या वेळच्या बैठकींत तुमच्या विनोदी बोलण्याला असा कांही ऊत आला होता की, तुम्ही आपल्या जिभेवर तीळ भिजूं देत नव्हता. आमची सर्वांची हसून हसून मुरकुंडी वळत होती, आणि कुणीतरी तुम्हाला उद्देशून माधवराव जोश्यांच्या नाटकांतलं "पांड्या! पांड्या! अरे, बॅरिस्टर कां नाही झालास?" हें वाक्यदेखील उच्चारलं.

नाटयछटेच्या यशाला विनोदबुद्धि, मिष्किलपणा, आणि किंचित् टीकाकाराचं गांभीर्य, हे गुण लागतात. हे सर्व गुण तुमच्या अंगीं जात्याच

असल्यामुळे या पुस्तकांतील तुमच्या सर्व नाट्यछटा वाचनीय, उद्बोधक, सुरस आणि परिणामकारक उतरल्या आहेत. तुमच्या यशाबद्दल मी तुमचं अभिनंदन करतों. याचं एक कारण मात्र सांगून ठेवतों. तुमचा वाङ्मयीन प्रवास इथेच संपूं देऊं नका. पुढे चालू ठेवा. नाट्यछटेपेक्षा अधिक अवघड असं कांही तरी लिहावयास घ्या. तें तुम्हाला जमेल अशी माझी खात्री आहे. तुमच्या या नाट्यछटा वाचणारे वाचक देखील तुम्हाला असंच सांगतील, तात्यासाहेब, तें तुम्हांला जमेल.

स्नेहांकित,
**ना. सी. फडके**

पुणें : २४-१२-५८

# छटा उमटण्यापूर्वी

माझ्या नाट्यछटांचा हा छोटासा संग्रह रसिक वाचकांपुढे ठेवण्यांत मला आनंद होत आहे. नाट्यछटांचा वाङ्मयप्रकार अलीकडे बराच उपेक्षिला गेला आहे. आणि अशा परिस्थितींत मी तो सर्वांचे पुढे आणण्याचें धाडस करीत आहें. प्रसंगाप्रसंगानें लिहून ठेवलेल्या नाट्यछटा मीं पुस्तकरूपाने प्रसिद्ध कराव्या असा आग्रह माझ्या अनेक मित्रांनी मला वारंवार केला व शेवटीं मी त्या आग्रहाला बळी पडलों. माझ्या या वाङ्मयीन कृतीचा रसिक वाचकवर्ग योग्य तो परामर्श घेईल अशी मला आशा आहे. वैयक्तिक वा सामाजिक दोषांचे सार्वजनिक रीत्या वाभाडे काढण्याचें नाट्यछटा हें एक प्रमुख साधन आहे असें मी समजतों. वाङ्मयक्षेत्रांत नाट्यछटांना शर्करावगुंठित कोयनेलच्या गोळ्या ( क्विनाइन पिल्स ) असें जर म्हटलें तर तें अतिशयोक्तीचें ठरणार नाही.

माझ्या या संग्रहाला प्रा. ना. सी. फडके यांनी पत्ररूपात्मक प्रस्तावना लिहून दिल्याबद्दल मी त्यांचे अंतःकरणपूर्वक आभार मानतों. तसेंच या संग्रहावर आपापले अभिप्राय व्यक्त केल्याबद्दल माझे गुरु प्रा. श्री. ना. बनहट्टी आणि मित्र प्रा. डॉ. वि. भि. कोलते, प्रा. भ. श्री. पंडित. प्रा डॉ. मा. गो. देशमुख व प्रा. अ. ना. देशपांडे यांना मी मनापासून धन्यवाद देतों.

हा संग्रह कॉन्टिनेन्टल प्रकाशन पुणें या संस्थेतर्फे प्रसिद्ध होत आहे. श्री. अनंतराव कुलकर्णी यांचे व माझे संबंध लक्षांत घेता त्यांचे आभार मानण्याचा औपचारिकपणाचा फार्स मला करावासा वाटत नाही.

अगदी थोड्या वेळांत मुखपृष्ठावरील चित्र काढून दिल्याबद्दल आर्टिस्ट श्री. मनोहर आणि प्रुफें तपासून देण्याची जबाबदारी पत्करल्याबद्दल श्री. अंबादास देवळे यांचे आभार मला मानायलाच हवेत.

गुरुवार दिनांक १२ फेब्रुवारी १९५९<br>वसंत पंचमी–शके १८८० माघ शु. ५<br>शिवाजीनगर, पुणें ५

रा. पु. सगदेव.<br>प्रभानिवास,<br>जेलरोड, नागपूर १

# अनुक्रमणिका


| विषय | | | पृष्ठ |
|---|---|---|---|
| १. डोळ्यांनी दिसत नाही माझ्या | | | ९ |
| २. अठरा लाख | - | - | ११ |
| ३. पानसुपारी | - | - | १४ |
| ४. साभार परत | - | - | १७ |
| ५. मी कमावतें आहे | - | - | २० |
| ६. मलाहि रागावतां येतें | | - | २२ |
| ७. मला मुळीसुद्धा बरं वाटायचं नाही | | | २४ |
| ८. टेलिफोनवर | - | - | २६ |
| ९. नागपंचमी | - | - | २८ |
| १०. खोटं बोलूं नको तर काय करूं | | | ३० |
| ११. मी अध्यक्ष होणार | - | - | ३२ |
| १२. आता हें काळं तोंड कुणाला दाखवूं | | | ३४ |
| १३. अहो, ती कुठे आहे | | - | ३६ |
| १४. दे दान सुटे गिरान | - | - | ३८ |
| १५. माझं हें असं आहे | - | - | ४० |

# १. डोळ्यांनी दिसत नाही माझ्या

घरीं आहे का कुणी ? नांवाच्या पाटीवर तर 'नाहीत' अशीं अक्षरं दिसतात.... बहुतेक घरमालक नसतीलच. कित्ती बारीक आहेत अक्षरं! मेलं आजकाल कसं डोळ्यांनी दिसतच नाही! काय हो नमुताई, ओळखलंत का मला तुम्ही? मी तुमच्या अण्णासाहेबांची आई. अरे हो, मी विसरलेंच की. तुम्ही एकदा आमच्या घरीं आमच्या सुनबाईला बाळंतविडा घेऊन आलां होतां नाही का? हें हो काय नमुताई, तुम्ही दिखील आमच्या सुनबाईची वडील बहीणच शोभतां आहांत. कुंकू लावायला विसरलांत वाटतं. काय म्हणतां?—आहे? हो, पण कित्ती बारीक लावलं हो तुम्ही!.... डोळ्यांनी दिसत नाही माझ्या. काय हो, तुमच्या हातांत काचेच्या बांगड्या नाही दिसत—काय म्हणतां हल्लीची फ्याशन? ह्या सोन्याच्या बांगड्या नवीन केल्यात वाटतं. किती केसासारख्या बारीक. पण यावरील वेलबुट्टी तरी किती रेखींव आणि चमकदार दिसते. आताशा किनई नमुताई, डोळ्यांनी दिसत नाही हो माझ्या.—आणि हें हो काय? तुमच्या नेसण्यांत कासोटा दिसत नाही! बायकांनी असं विकच्छ राहणं चांगलं नाही. परवाच मीं कोणत्या तरी मासिकांत वाचलेलं आठवतं की 'महाराष्ट्रीय तरुणींनो तुम्ही आपले कासोटे सांभाळा' म्हणून. तुम्हाला कासोटाच नाही, तेव्हा सांभाळणार काय?—काय म्हणतां, विकच्छ राहण्यांत कापडाची बचत होते आणि खर्चहि कमी लागतो?—वा! वा मग

परकरच् कां नाही नेसत? त्याला तर त्याहीपेक्षा कमी खर्च लागेल. काय हो, त्यांना पगार किती मिळतो?—काय म्हणतां माहीत नाही? पुरुषांना त्यांचा पगार आणि बायकांना त्यांचं वय विचारूं नये म्हणतात.—हं: हं: हं:....

बरं काय हो, हा फोटो कुणाचा? फारच सुंदर दिसतो नाही?—काय त्यांच्या पहिल्या बायकोचा? काय म्हणतां?—फारच सुंदर आहे नाही का? गळ्यांत ठुशी व चिंचपेटी पण दिसते—डोळ्यांनी बरोबर दिसत नाही माझ्या. अहो नमुताई, तुमच्या मुलीच्या हातांतली बघितली का ती बारीक टाचणी? बोचेल ना तिला? उचला बरं अगोदर. आताशा किनई डोळ्यांनी कसं दिसतच नाही—काय म्हणतां, तुम्हाला भगिनी मंडळांत जायचं आहे—मलाहि घरीं गेलंच पाहिजे लौकर—काय कॉफी घेऊन जायला हवं? झालीच आहे म्हणतां? बरं आणा तर. आं? पण यांत हीं बारीक बारीक फोलटीं कसलीं?—विलायचीचीं आहेत!—अस्सं, डोळ्यांनी दिसत नाही हो माझ्या. अहो नमुताई, एखादी रिक्षा असेल तर बघतां का—हं हं ठीक. केवढ्यांत ठरवलीत?—आठ आण्यांत—बरं जातें मी. त्यांना सांगा मी आलें होतें म्हणून—कायरे रिक्षेवाल्या, हे बारीक बारीक खिळे किती वर आले आहेत? लुगडं फाटेल की माझं! अरे, डोळ्यांनी दिसत नाही माझ्या. हं चल बर्डीवर संगमचाळींत. हें रे काय! मीं तुला रुपया दिला ना? अन् तूं हें चोपडं नाणं कोणतं दिलंस?—चुकून पावली दिली म्हणतोस—? अरे मेल्या, डोळ्यांनी दिसत नाही माझ्या म्हणून?......

साप्ताहिक 'समाधान', नागपूर ता. १९-९-४८

* * *

मराठी ग्रंथ संग्रहालय
अनुक्रम
विभाग
क्रमांक
नों. दि.

# २. अठरा लाख

आई, आई, ए आई, ऊठ. आली, अग ही बघ, आली—काय म्हणालीस? कोण आली म्हणून?—अग ही बघ तार आली—काय म्हणतेस? कशाबद्दल?—अग, कशाबद्दल म्हणून काय विचारतेस? कशाबद्दल असणार? अर्थात् लॉटरीबद्दल. अग पण मी आनंदाच्या भरांत तारेंतील मजकूर वाचण्यास विसरलोंच—अरेच्या, आं, पण हें काय? हें तर भलतंच! ही दादाची तार! वहिनीची प्रकृति बरी नाही! कोणी तरी पाठवा!—काय म्हणालांत तात्यासाहेब? Congrats !—पण नाही हो, अजून खरी तार यायचीच आहे.—काय हो केशवराव, मला डर्बी लॉटरींत मिळालेलें अठरा लाखांचं रेसिड्युअल प्राइझ कोणत्या बँकेंत ठेवणं Safe होईल?—काय म्हणतां? इम्पीरियल?—Thanks, Thanks. ! !

अग ए, इकडे ये. अशी घाबरतेस कां?—काय म्हणालीस कशाला हाक मारली म्हणून?—अग ऐक तर, तुला आता शंभर शंभर रुपयांचीं लुगडीं आणतों रोजच्या नेसायला!—अरेच्या! हें काय? तूं तर हसायला लागलीस!—काय म्हणालीस आणखी काय?—आणखी एक नवीन कोरी करकरीत बेबी ऑस्टीनहि खरेदी करितों. पहा तर मजा—आं एवढंच?—अरे वा! तुझं चऱ्हाट तर चाललं लांबत?—बरं, बरं, अशी रुसूं नकोस. आणखी या समोरच्या मोकळ्या प्लॉटवर तुझ्या नांवाची एक छानदार दगडी इमारतहि उभारतों. मग तर झालं ना? आहेस कुठे?—अग पण हें काय? आतापासूनच तूं डोक्यावरून पदर घेतलेला दिसतोस!—काय म्हणालीस? Practice

करते ?—अग पण हा लक्तेऱ्या पदर नाही शोभत तुझ्या गौरवर्णाला. चंदेरी पातळ आणीन तेंव्हा घे तो झोकदार पदर डोक्यावर म्हणजे शोभशील खरी श्रीमंताची बायको !

कोण ? दिनकरराव ! काय म्हणतां ? तुम्हास बातमी कळली ! अरे वापरे !—काय म्हणतां, तुमचा या लॉटरींत अर्धा हिस्सा ! काय नऊ लाख तुमचे ?—वाहवा, वाहवा ! अहो, माझ्या धाकट्या मुलीचं नशीब थोर म्हणून ही लॉटरी मिळाली मला. आहांत कुठे ? अहो, फार झालं तर अर्ध्या तिकिटाचे दिलेले रुपये साडेपांच घेऊन जा तुम्ही, आणखी काय ? अहो, प्रिय मित्र झालांत म्हणून काय मी एवढा मोठा हिस्सा देऊन टाकू तुम्हास ? शाबास !—काय म्हणालांत ?—मी बेइमान ! हरामखोर ! पाजी ! लुच्चा ! खबरदार दिनकरराव, आता एक शब्द जास्त बोलाल तर. चला, चालते व्हा माझ्या इथून मुकाट्यानं ! नाही तर धक्के मारून घालवीन तुम्हाला मी इथून ! !

कोण ? भैय्यासाहेब ?—काय म्हणतां ? माझं अभिनंदन करण्यासाठी आलांत ?—पण काय हो, अजून तार कशी नाही आली ? मी तर गेले दोन दिवस सारखी वाट पहात आहे. अठरा लाखांचं बजेटहि करून तयार आहे. काय म्हणतां ? मला हें कळलं कसं ?—अहो त्यांत काय ? आमच्या भाडेकऱ्यानं सांगितलं आम्हास, आणि त्यानंहि पण आपल्या मित्राकडील रेडियोवर ऐकलं म्हणतात. शिवाय तो म्हणाला की, अठरा लाख रुपये आहेत की पौंड आहेत, हें नक्की जाहीर झालं नाही—काय म्हणतां ? मी स्वस्थ पडून राहूं ! !

काय हो तात्यासाहेब, कुणीकडे—काय ? माझ्याचकडं आलांत ?—मी तर आजपासून चार महिन्यांच्या सुटीचा अर्ज केला आहे. हो, डॉक्टरांनी सांगितलं, हर्षवायु झाला नाही हें नशीब !—काय म्हणतां ? बेट्या भाडेकऱ्यानं 'एप्रिल फूल'चा वचपा म्हणून

चांगलाच 'बिगफूल' बनविला मला?—काय म्हणतां मला विश्रांतीची जरूरी आहे? If I have not gained anything, at least I have not lost anything असें म्हणतां—बरं, बरं, चालते व्हा इथून, मोठे आलांत उपदेश करायला!!!

'सुषमा' मासिक, नागपूर—जानेवारी १९४९.

* * *

# ३. पानसुपारी

कोण आहे रे तूं? कशाला आलास इकडं?—काय म्हणतोस? श्रीमंताकडून पानसुपारीचं बोलावणं करायला आलास!—बरं, बरं, येईन म्हणून सांग बरं का त्यांना—पण हें बघ, जातां जातां माझंहि एक काम कर तूं. ज्या ज्या ठिकाणीं जाशील तेथे तेथे आमच्याकडंहि पानसुपारीचं बोलावणं आहे म्हणून सांग सर्वांना. म्हणजे आमच्या मुलांना त्रास नको—याबद्दल उद्या तुला फराळाचं देईन हो! दिवाळीचेच दिवस आहेत! तेव्हा म्हटलं फराळाला काय कमी पडणार?

काय ग, काय करतेस तूं? अग इकडं तर ये—आज आपल्या घरीं दिवाळीची पानसुपारी करण्याचं ठरविलं आहे मीं. तेव्हा म्हटलं जरा झोकांत रहा! आणि बाबा लोक कुठं आहेत? ए गोप्या, बंड्या, विठ्या, बाप्या, सद्या, कुठं गेलांत रे तुम्ही? काय कारटीं जन्माला आलींत! चोरांना रोजच खंडीभर खायला हवं आणि कामाच्या नांवानं बोंब. लेकांना आजचा प्रसंग कोणता आणि त्याचं महत्त्व काय? कांही केल्या कांही कळत नाही या बेट्यांना—काय ग, काय म्हटलंस? फराळाला पाठविलीस शेजारीं आपली सर्व पलटण? वा, वा, तूं खरी धूर्त दिसतेस!!

काय म्हणतेस संध्याकाळच्या पानसुपारीच्या तयारीला लागूं! मी सुद्धा तेंच म्हणणार होतों बरं! सर्वजण जर परत आले असतील तर पाठव त्यांना माझ्याकडं. म्हणजे मी त्या प्रत्येकाला सांगतों, की शेजारच्या घरीं पानसुपारीला जा. म्हणजे येतील कमींत कमी पन्नास विडे घरांत. अग, आपल्याकडं येऊन येऊन पानसुपारीला

लोक येणार किती? फार झालं तर येतील चाळीस पन्नास माणसं! पुरतील त्यांना हे सर्व विडे!!

काय म्हणालीस, चांदीचीं भांडीं नाहीत घरांत? अग, आण की जवळच्या श्रीमंत बापूसाहेबांकडून मागून. त्यांत काय? दोन तासांनी परत करतें म्हणून सांग! अरे वा! तुझा तर थाट बघायलाच नको! आं, पण हा चंदेरी शालू कुठला आणलास ग? काय शेजारच्या कमलाबाईंचा!—वा, वा! थाट तर खूप जमला! अन् या गुलाब-दाणींत थोडं पाणी घाल पाहूं—आहे काय त्यांत? गुलाबदाणींत पाणी घातलं की झालं!

अरे हें काय? लोक तर यायला लागलेत! अग, आटोप लौकर लौकर—पण मुलं कुठं आहेत?—कारट्यांचा वेळेवर कधीच पत्ता रहायचा नाही—या नमस्कार! या भाऊसाहेब! या साहेब! बसा असे—काय म्हणतां कसची पानसुपारी?—अहो कसची काय? म्हटलं आपणहि करावी साऱ्यांना पानसुपारी! आणि म्हटलं आपणा-सारख्या महाभागांचं कसं बरं दर्शन घडणार!!

काय म्हणतां भाऊसाहेब, पानदानांत पानसुपारी नाही? अहो, त्याचं असं झालं, की ही पानसुपारी अगदी वेळेवरच आणि घाईघाईनं ठरविण्यांत आली अन् मुलं गेलीं आहेत पिकलीं पानं आणायला—कोण दादाजी, या, बसा—अरे वा! वा बरंच झालं की. दादाजींची चंची खूपच मोठी आहे म्हणा! येतील तोंवर कारटीं!!

अन् कोण रे तूं?—राम्या, श्रीमंतांचा नोकर?—काय म्हणतोस श्रीमंतांच्या दिवाणजीनं बिछायत, चांदीचीं भांडीं नि बाईंनी दिलेला शालू ताबडतोब मागितला—अरे, आमची पानसुपारी तर होऊन जाऊं द्यावयाची होती! काय म्हणालास—दोन तासांचा करार होऊन वर

दोन तास झालेत—बरं, बरं, थांब जरा थोडा !— काय म्हणतोस ? सामान ताबडतोब पाहिजे—अरेच्च्या, हें काय ? तुम्ही सर्व तसेच चाललांत ?— काय म्हणालांत भाऊसाहेब ?— ऐपत नव्हती तर कशाला केली पानसुपारी—अहो जन्मभर आम्हाला ऐपत येणारच नाही ! पानसुपारीचा ठेका काय श्रीमंतांनीच घेतला ? आमचीहि इच्छा झाली करावी म्हणून आणि नंतर केला सर्व हा प्रकार— अहो, श्रीमंतांवर असा प्रयोग केला नाही, तर आम्हां गरिबांना केव्हा मिळणार मजा करायला उभ्या आयुष्यांत ? काय म्हणतां ? उसनी ऐट कामाची नाही—अहो भिकाऱ्यानं शिकारीच बनलं पाहिजे. तरच त्याची धडगत आहे ! त्याशिवाय मौज नाही—काय म्हणतां असं हसं होणं चांगलं नाही—अं त्यांत काय ? मनुष्यानं थोडा वेळ तरी आयुष्यांत बेशरम व्हावं ! काय म्हणालांत—जातां ? अच्छा, नमस्कार, नमस्कार मंडळी—! !

'सुषमा' मासिक, नागपूर, जून १९४९.

★ ★ ★

## ४. साभार परत

नमस्कार दादासाहेब—नमस्कार भाऊसाहेब, नमस्कार वा! वा! तुम्ही तर अगदी देवासारखे आलांत. या, बसा असे. अरे पण, इथं नकोच बसायला आपण! आंतल्या दिवाखान्यांतच जाऊन बसूं या म्हणजे आपण काय बोलतों तें ऐकायला नको कुणी. कारण बाहेर आमची नातलग मंडळी बसली आहे थोडी.

काय म्हणतां? मी आज फारच खिन्न दिसतोय्—? तुम्ही बरोबर ओळखलं भाऊसाहेब. त्याचं असं झालं, मीं एक कविता करून 'सत्य-कथे'कडे पाठवली. चार दिवसांनीं पहातों तों ती साभार परत नंतर ती 'मनोहर'कडे पाठविली! एक आठवड्यानं पहातों तों कविता पाठवल्याबद्दल आभाराचं पत्र व त्यांतच 'पण ती कविता आम्हास छापतां येत नाहीं, सबब साभार परत! क. लो. अ. ही वि.' त्यानंतर 'अभिरुचि' मासिकाकडे पाठवली. तेथेहि तीच गत. हे एका मागून एक झालेले प्रकार पाहून मला या चोर संपादकांचा असा राग आला म्हणतां की काय सांगूं! पण म्हटलं जाऊं द्या. अहो! उत्तरा-साठी तिकिटें पाठवून झक मारली आम्हीं. तीं नसतीं पाठवलीं तर निदान कविता तरी परत आली नसती. मग मला असं वाटलं की, ती एखाद्या कवि-मित्राकडे तपासण्यास व दुरुस्तीस द्यावी म्हणून.

काय म्हणतां? त्या कवि-मित्रांकडं दिलेल्या कवितेचं काय झालं म्हणून? सांगतों ऐका—ती मूर्ति एक दिवस डुलत डुलत आमचेकडे आली व म्हणाली—'साहेब, तुमच्या कवितेंत विनोद भरपूर आहे, परंतु ती दुरुस्त कशी करावी हेंच समजत नाही मला. तसं करणं म्हणजे

शिंग मोडून वासरांत शिरण्यासारखं होईल, म्हणून ती सुधारण्याच्या भानगडींत फारसा पडलों नाहीं! असं म्हणून ते महाशयहि आमची ती कविता साभार परत करून चालते झाले.

खरोखर सांगतों भाऊसाहेब, हीं यमकांचीं बंधनं फारच बुवा. त्या मोरोपंताला दुसरा कांही उद्योगच नव्हता. 'अधुकल्या मधुकल्या' खायचा आणि यमकं प्रसवत बसायचा. आजच्यासारखं रेशनिंग आणि 'फूड-कंट्रोल' तेव्हा असतं म्हणजे समजलं असतं बोवाला काय तें. मग लागला असता बेटा आर्या सोडून भार्या घेऊन भटकायला.

अहो भाऊसाहेब, हीं बंधनं नसतीं तर आतापर्यंत माझीं कितीतरी काव्याचीं पुस्तकं प्रसिद्ध झालीं असतीं. पण काय करूं? नाइलाज झाला माझा—काय म्हणतां भाऊसाहेब? काळजी करण्याचं कारण नाही—तें कसं काय बुवा? काय म्हणतां? आजकालच्या कवितेंत एक नवीनच प्रकार निघाला म्हणतां—काय मुक्तछंद म्हणतात त्याला? याला कशाचंच सोयरसुतक नाही म्हणतां? 'निरंकुशाः कवयः' हें तत्त्व त्यांत सर्रास लागूं पडतं—वाहवा, केवढी सोडवणूक झाली म्हणतां माझी—काय म्हणतां हें जवळ जवळ गद्यच असतं म्हणून! फक्त कवितेच्या रूपांत लिहून वर जाड्या टाइपांत मुक्तछंद हीं अक्षरं छापलीं कीं झालं काव्य. ळ मध्ये, क शेवटीं, टी तशीच पहिल्याने ....कवि आरादे हो म्हणे ।। ह्या ओळी तरी जुळवायला प्रयास पडतील. पण तो प्रकार म्हणजे बटन दाबण्याची खोटी की दिवा लागलाच म्हणून समजा.

वा, वा, भाऊसाहेब, काय बहार केली या मुक्तछंदानं! काय आनंद झाला म्हणून सांगूं मला हें ऐकून!! काय म्हणतां? या मुक्त-छंदांतून पुष्कळसे मुक्तिबोधहि निघूं शकतात—काय ते दुर्बोधहि असतात म्हणतां? दुधांत साखरच पडली म्हणायची. आता भरभर

मी आपलीं काव्याचीं पुस्तकं छापून प्रसिद्ध करितों आणि पहातों कशी तीं मान्य ( Recognise ) होत नाहीत तीं. साऱ्या लायब्रऱ्या व शाळा-कॉलेजांतून लावायला सांगतों आणि यापेक्षाहि सोपे म्हणजे रेडिओ-वर वारंवार मुक्तछंदाचे कार्यक्रम करावयास लावतों. मग तर झालं ना ? काय नामी युक्ति आहे की नाही ही ऑल-इंडिया-फेम मिळ-विण्याची ? अहो, तुम्ही समजलांत काय मला ?

काय म्हणतां भाऊसाहेब—'अहो, मला कशाला सांगतां हें समजलांत कीं नाही म्हणून ? दुसऱ्या कुणाला सांगा. गुरूची विद्या गुरूलाच प्रदान करण्यासारखं आहे' म्हणतां हें—चुकलों, चुकलों अं ! बरं, बरं, माफ करा अं भाऊसाहेब.

काय सांगूं भाऊसाहेब, अहो हीं मुक्तछंदाचीं सारीं लक्षणं मजजवळ असतां मला ही कविता इतरत्र पाठवण्याचं अवलक्षण कसं सुचलं तेंच समजत नाही. विलक्षणच डोकं म्हटलं पाहिजे माझं !!

काय ? जातों म्हणतां ?—काय, काय म्हणालांत ?—मी आपल्या या नवीन मुक्तछंदाच्या छापून होणाऱ्या प्रतीवर एखाद्या प्रथितयश अशा कवीची प्रस्तावना घेऊं म्हणतां ? आणखी काय ?—म्हणजे अभिप्रायासाठी मी जेव्हा ती प्रत पाठवीन तेव्हा निदान प्रस्तावनेकडे पाहून तरी ती प्रत साभार परत येणार नाही म्हणतां ? वा ! वा ! या सूचनबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे बरं का. आणि या खेपेला उत्तरासाठी मी नक्कीच एकहि तिकीट पाठविणार नाही भाऊसाहेब ! म्हणजे पाठविलेल्या प्रति साभार परत येण्याचं नांवच नको. काय म्हणतां ? बराच उशीर झाला आहे....बरं, बरं, नमस्कार ! नमस्कार अं !!

'विकास' तळेगांव जनरल हॉस्पिटल—
दिवाळी अंक : १-११-१९५०

* * *

# ५. मी कमावतें आहे

अहो ! ऐकलं का मी काय म्हणतों तें ?—काय म्हणतां ? कामांत आहांत—अहो हा फिरता वाचनालयवाला बिल मागायला आला आहे—काय दर महिन्याला बिल द्यावं लागतं म्हणून वाचनच बंद करूं म्हणतां ? नशीब आमचं ! इतकं शिकून, इतक्या पदव्या संपादून शेवटीं अक्षर फारकत होण्याचीच पाळी आली म्हणायची !

कोण रे तूं ?—धोबी. दोन महिन्यांचे पैसे पडलेत न्यायचे—अहो बाईसाहेब, धोबी पैसे मागायला आला आहे— काय म्हणतां बसल्या ठिकाणीं माझे कपडे असे मळतात—अहो, यापेक्षा तुमच्याच सहवासांत राहून ते जास्त मळतात—काय म्हणतां मला नोकरी नाही म्हणून मी कपडे घालणंहि सोडून देऊं—वा, मग तर झालं, सर्वच आटोपलं म्हणायचं. ठाण्यालाच करावी लागेल रवानगी आमची ! !

काय चार वाजलेत ? तुम्ही शॉपिंग करायला जातो म्हणतां ? तुमचं टॉयलेटिंग संपलं, ठीक ठीक—बरं येतांना एक सुंदरशी झरणी (फाउंटनपेन) आणाल काय मजकरिता ! मी आता लेख लिहायला सुरुवात करणार आहे म्हटलं बाईसाहेब—काय तुमच्यासारखी चालती बोलती तरणी जर मला चालत नाही तर त्या झरणीपुढे आमचा काय उजेड पडणार आहे म्हणतां ? म्हणजे एकंदरींत आमची वरणी लागण्याचं लक्षण दिसत नाही म्हणायचं ?

तुम्ही रोहिदास मंडळाच्या सभेला जाऊन येतां तोंपर्यंत मी घरांत बसून स्वैंपाक करूं म्हणतां—वा, आता तर दिवसेंदिवस आमची बढतीच होत चालली म्हणायची—रोजच्या खर्चाला पैसा नाही,

नोकरी नाही, त्यामुळे तोंड दाबून बुक्क्यांचा मार! एखाद्याचा घरजावई झालों असतों तर बरा राहिलों असतों—काय म्हणतां मीच तोंड आवरूं—बोलण्याची अक्कल नाही म्हणून पैसे कमावण्याची शक्कल सुचत नाही म्हणतां—आता तर तुमच्या बोलण्याची दखल घेणंहि पापच झालं आहे म्हणायचं—काय म्हणता, तुम्ही घर सोडून चालत्या होणार—म्हटलं मलाहि देवानं पाय दिले आहेत—अं? काय म्हणतां? ज्याला स्वतःच्या पायावर उभं राहतां येत नाही त्याच्या पायांचा काय उपयोग? अशाला पांगुळगाडाहि अपुराच पडेल म्हणतां?

बरं, बरं, बायकांच्या जातीला एवढं बोलणं नको. कितीहि झालं तरी मी पुरुष आहे—कितीहि झालं तरी तुम्ही कमावते आहां म्हणतां—ठीक आहे तर!!

—'सुषमा' मासिक, नागपूर, ऑक्टोबर. ५२

* * *

# ६. मलाहि रागावतां येतं

कोण आहे ? जोशी काका, या, आंत या असे—काय म्हणालांत ? वहिनी कुठे आहे म्हणून ?—ती गेली...पण जाऊं द्या. अहो, सकाळीं उठल्यापासून हा मी एकटा बसलों आहे. आजचा प्रजासत्ताक दिन आहे ना ? गेली कुठल्या तरी सभेला—काय म्हणतां बारा वाजायला आलेत. बरोबर आहे, आमचे वाजले नाहीत हें नशीब समजा. अहो, हें माझं चौथं कुटुंब, तेव्हं थोडं जपूनच घ्यावं लागतं—काय माझ्या जागीं तुम्ही असतां तर खूप रागावला असतां म्हणतां—अहो, मलाहि रागावतां येतं म्हटलं, पण नाही रागावत झालं !

अरे बबन, कुठं चाललास ?—काय मॅच पहायला—रोज रोज काय रे मॅच पहायची ? विनाकारण खर्च नाही का होत ? बरं बरं, झाला म्हणून काय झालं, मी करणारच, पैशाला काय कमी आहे असं म्हणतोस ?—अरे वा ! तूंच माझ्यावर उलट रागावतोस काय ? म्हटलं मलाहि तुझ्यासारखं रागावतां येतं, पण नाही रागावत.

बघितलं जोशी काका, मुलं बरोबरीचीं झालीं म्हणजे असं मूग गिळून बसावं लागतं. निढळाच्या घामानं पैसा कमावला मी जन्मभर आणि त्यावर मजा करणार हे जगभर !! अहो, सकाळीं तुम्ही येण्याचे अगोदर आमचे एक मित्रवर्य येऊन गेलेत. दोन महिन्यांपूर्वीच त्यांनी दोनशे रुपये नेले. पुन्हा वर शंभर रुपये मागूं लागला उसने. मीं म्हटलं आता कुठून देऊं ! तर उलट तोच माझ्यावर मोठमोठे डोळे काढूं लागला—मीं म्हटलं, अहो महाशय, मलाहि रागावतां येतं बरं का ! !

कोण आलं हो तिकडं जोशी काका ?—काय म्हणतां तुमच्या वहिनी साहेब उगवल्या—ठीक झालं. घरांत पाय राहत असेल तर शपथ—काय म्हणतां तुम्ही आमच्याशीं लग्न करून पस्तावलांत—अरे वा, आम्ही तर उलट तुमच्या रूपाने भाळलों व गुणाने पोळलों—काय म्हणतां ? पुरे पुरे, आमच्यांत कांही तथ्यच नाही. आमच्याकडं न पाहतां आमच्या पैशाकडं पाहून लग्नं केलं म्हणतां आणि वर आता मलाच चूप बसायला सांगतां—अहो बाईसाहेब, म्हटलं मलाहि तुमच्यासारखं रागावतां येतं—पण म्हटलं जाऊं द्या, उगाच तुमची शोभा नको व्हायला !

कोण आहे रे तिकडे ? राम्या !—काय रे, किती वेळ केलास यायला ? ही काय नोकरी करण्याची तऱ्हा आहे ?—काय म्हणतोस ठेवायचं असेल तर ठेवा. नाहीतर पैसे चुकते करा—अरे वा ! उशीर तुझा नि कसूर माझा ! खासा न्याय म्हणायचा ! म्हटलं मलाहि तुझ्या-सारखंच रागावतां येतं बरं का. पण नाही रागावत झालं. जा लाग आपल्या कामाला ! !

‘ तरुण भारत, ’ नागपूर, दिवाळी–विशेषांक—५२

* * *

## ७. मला मुळीसुद्धा बरं वाटायचं नाही

या मंडळी, हं हा आपलाच डबा बरं का ! थांबा मी आंत होऊन बर्थ रिझर्व केला आहे का तें बघतों. अरेच्च्या, इथे तर माझं एकट्या-चंच नांव दिसतं. बरंऽऽ असूं द्या. अहो दामले आणि पंत, या या, आंत या. गाडीची शीळ झाली, चटकन् आंत या बरं का, नाहीतर गाडी सुटेल.

पंत आणि तुम्ही असे बाजूला बसा—अरे हो, डब्यांतील बाकीची मंडळी महाराष्ट्रीयच दिसतात की. वा, वा, नमस्कार मंडळी—काय म्हणतां आम्ही कुठून आलों—आम्ही गांधीजींचं सेवाग्राम बघायला गेलों होतों. माझं निघण्याचं नक्की असल्यामुळे मी अगोदरच बर्थ रिझर्व केला, पण माझ्याबरोबरच्या दोन मित्रांचं वेळेवरच येण्याचं ठरलें—काय म्हणतां ? रात्रीची वेळ तेव्हा निजण्याची सोय काय ? - अहो, त्याची काळजी करूं नका. मला एकट्याला निजायला मुळीसुद्धा बरं वाटायचं नाही. मी आपला खालीच पथारी घालीन व माझे सोबती माझ्या बर्थवर झोपतील.

काय हो, कोणचं स्टेशन हें ? काय रात्रीची वेळ असल्यामुळे जवळच्या डब्यांत असलेली तुमची मंडळी व मेव्हणी या डब्यांत आणतों म्हणतां—बरं बरं अवश्य आणा—काय म्हणतां पंत, झोपायला अडचण होईल—अहो, मला मुळीसुद्धा झोप यायची नाही. शिवाय तुम्हाला जागं ठेवून मला मुळीसुद्धा बरं वाटायचं नाही.

इकडे बघा, तुम्ही सर्व झोपा बरं का. मला झोपायचं नसल्यामुळे माझा प्रश्न सुटला—काय तुम्ही डायनिंग-कारमधून जाऊन येतों

म्हणतां—ठीक, अवश्य जा बरं का—काय मलाहि चला म्हणतां—पण रात्रीचा मी मुळींसुद्धा जेवत नसतों बरं का. माझी आपल्याला एक विनंती आहे. उद्या सकाळीं सर्वांच्याकरता माझ्यातर्फे वेटरला चहा आणायला तेवढा सांगा—काय तुम्ही जेवण करून येतों म्हणतां. बरं, बरं,—अरेच्च्या, ह्या बाया तर झोपलेल्या दिसतात !!

काय? सकाळ झाली! चहावाला पण आला. म्हणजे हें इगतपुरीचं स्टेशन वाटतं? अरे, पंत आणि तुम्ही रात्रभर जागतच होतां? अहो, काय सांगूं तुम्हांला? तुम्ही जेवायला निघून गेलांत आणि डब्यांत परत केव्हा आलां हें मुळींसुद्धा मला कळलं नाही. कशी झोप लागली ईश्वर जाणे. पण तुम्ही रात्रभर जागलात हें ऐकून मला मुळींसुद्धा बरं वाटत नाही !!

"महाराष्ट्र," नागपूर–दिवाळी विशेषांक १९५२.

* * *

# ८. टेलिफोनवर

" हॅलो ! कोण म्हटलं ? सुधाकर वाटतं ? मी पुष्पा रेवदंडे. सध्या टेलिफोन ऑपरेटर म्हणून इथं काम करतें—आपण त्या दिवशीं माझ्या नातलगाबरोबर मला भेटायला आमच्या घरीं आला होतां ?—अय्या, Sorry, मी किनई त्या दिवशीं माझ्या मैत्रिणीकडे जेवायला गेलें होतें—आपल्याशीं बोलण्याची थोडी Liberty घेऊं का ? रागावणार तर नाही ना ? हें सर्व मात्र खाजगी व आपल्यापाशींच असूं द्यावं—काय एकदम बोलूं म्हणतां ? अहो, पण मला किनई थोडं कसंसंच वाटतं बोलायला—त्यांत काय आहे ?—अं, अं, त्याचं असं की, आपल्याकडून नकार आला तर ?—असं, असं, पण समक्ष पाहिल्यावांचून कसं सांगणार ?—हो खरंच—तशी माझी माहिती आपणांस मिळाली आहेच—आपल्याकडून सर्व तयारी आहे ? नववधूकरिता नेकलेस, बांगड्या इ. सर्व तयार आहे म्हणतां ?—अहो, आज आपण एखाद्या निवांत जागीं संध्याकाळीं भेटूं यांना ?—काय रामदास पेठच्या पार्कमध्ये संध्याकाळीं सहा वाजतां येणार आणि येतांना इयररिंग, नेकलेस, बिलवर सर्वच आणणार ?—वा, वा, कित्ती कित्ती चांगले आहांत हो तुम्ही ! ! मग मी हें पक्कं समजूं ना ?—काय आपली भेट झाल्यावर नक्कीच म्हणायचं ?—बरं, बरं, Many thanks अं ! मी पार्कमधील बॉबरखाली जो बाक आहे ना तिथंच बसली असेन आपली वाट पहात. आपण नक्की येतां ना ? या बरं, नाहीतर शप्पथ आहे गळ्याची माझ्या ! ! "

" आपण कोण !—पुष्पा रेवदंडे ? अरे बापरे ! ! नमस्कार, मी चलतों. मला जरा जरुरीचं काम आहे—सगळं ठरलं होतं खरं, पण तें

आपली भेट झाल्यावर—अहो, मला वाटलं नव्हतं की ही आफ्रिकेची हुंडी पटविण्याची पाळी माझ्यावरच येईल म्हणून ! बरं, रंग तर राहूंच द्या पण हें रूप ?—वा, वा, ईश्वरा ! बचाव कर माझा—मी चाललों अं—नमस्कार—हो, पण सगळं कांही आता आपल्याशीं टेलिफोन-वरच बोलेन. इथं जास्त वेळ थांबलों तर आपल्या उपस्थितीनं मला मूर्च्छाच यायची—उद्या टेलिफोनवरच बरं का ! ! नमस्कार अं. अरे बापरे, सुटलों एकदाचा या कचाट्यांतून ! ”

“ सुषमा ” मासिक, नागपूर—माहे मे १९५३.

* * *

# १. नागपंचमी

कोण हाका मारताय्? दादासाहेब! अरे वा! या, या, पुष्कळ दिवसांनी आलांत. या, असे आंत या. मी पूजेंत आहें. आज नागपंचमी आहे ना! अग ए, यांच्यासाठी एक पाट आण पाहूं लौकर. बसा असे भिंतीशीं टेकून. काय, मी पूजा चालू ठेवूं?—अहो तिचं काय? पोटपूजा होण्यापूर्वीची ती एक मजा आहे—काय तुम्हांला ती एक सजा वाटते?—अहो त्याचं असं आहे दादासाहेब, तो एक संस्कृतीचा परिणाम आहे. शिवाय कुटुंबांतला मोठा मुलगा म्हणून सणांची सर्व जबाबदारी माझ्याच माथीं पडली. तेंव्हा हें करायलाच हवं मला. हें सापाच्या आकाराचं काय आहे म्हणतां? अहो, आज नागपंचमी नाही का? तो कणकीचा केलेला साप आहे. झाली, पूजा संपतच आली आहे. फक्त दुधाचा नैवेद्य दाखविला की आटोपलं—काय, तुम्ही धर्म, सण वगैरे कांहीच मानीत नाही! तुम्ही भारीच नास्तिक दिसतां—काय तुम्ही पूर्ण आस्तिक आहांत?—मग हें काय?—म्हणजे अंधश्रद्धा नाही म्हणतां—अहो त्याचं असं दादासाहेब, आपल्या संस्कृतीची आपणच जर जोपासना केली नाही, तर दुसरं कोण करणार बरं? शिवाय सणाच्या निमित्तानं गोडधड चापायला मिळतं तें निराळंच!!

काय, आमचा बाळ कुठं गेला? तो कॉलेजांत गेला आहे. पंचमीनिमित्त सकाळचं कॉलेज आहे त्याचं आणि इकडे त्याची आई गुंतली आहे स्वैंपाकांत!!

अरे, हा कसचा आवाज? आं, हा तर आमच्या बाळाचा आवाज—काय साप निघाला? आं म्हणतां काय?—अरे, मार त्या सापाला,

हा घे सोटा. जिवंत सोडूं नकोस. हं ठेच त्याला. हाण आणखी दोन सोटे वर. तो बघ वळवळ करतो. अस्सं, संपलं ना पूर्णपणें. छान छान !—काय म्हणता दादासाहेब, आजचा दिवस तो कोण आणि हें घडलं काय ? त्या सापाला दूध पाजायचं सोडून उलट त्याला स्वर्गाची वाट दाखविली ?—अहो, सापाला दूध पाजून त्याचं विष होणं काय बंद होणार ? अंधश्रद्धेमुळं कणकीच्या सापाला दूध पाजण्याची जरी आमची लहर असली तरी जिवंत सापाला दूध पाजून त्याचं जहर होणं थोडंच थांबणार ? अहो, घरांत साप निघाल्यावर त्याला कोणता शहाणा मोकळा सोडील बरं ? त्याला मारलंच पाहिजे. मग ती नागपंचमी असो नाही तर रंगपंचमी असो—काय, एकंदर आमच्या अंतरंगाची आणि बहिरंगाची प्रचीति घडली म्हणतां—नाही असं नाही; मी तसा पक्का धार्मिक आहें. स्नान-संध्या, पूजा केल्या-शिवाय अन्नाला शिवत नाहीं—अग ए, झाला का स्वैंपाक ? मग वाढ तर नागोबाचा नैवेद्य लौकर—पोटांत कावळे ओरडायला लागलेत ना !!

तरुणभारत, नागपूर, स्वातंत्र्यदिन विशेषांक,
शनिवार ता. १५-८-१९५३.

★ ★ ★

## १०. खोटं बोलूं नको तर काय करूं ?

नमस्कार, या बसा, गाडी सुटेलच इतक्यांत—हं कसं काय ? आयुष्य मजेंत ना ?—आपलं आयुष्य सर्व खोटं बोलण्यांतच जातं ? मग तुम्हाला शिक्षा होऊन तुम्ही जेलमधे कसे गेलां नाहीत ?—जेलमधे जाणं दूरच राहिलं; पण खोटं बोलण्यानं कित्येकांचे प्राण वांचविले म्हणतां ?—एकूण तुम्ही खुनी माणसाचे साथीदार दिसतां तर—तसं नाही ? तर मग तुम्ही नित्याचे खोटी साक्ष देणारे असाल. तेव्हा तुम्हाला 'कोर्ट बर्ड' म्हणावयास हरकत नाही—हेंहि तुम्हाला कबूल नाही ? म्हणजे इथंच आता सपशेल खोटं बोलण्याचं ठरविलं वाटतं ?

काय हो ! मग या खोटं बोलण्यामुळं तुमचा धंदा चांगलाच चालत असला पाहिजे. काय ? तो चांगला चालून पैसेहि भरपूर मिळतात ? खोटं बोलून पैसे मिळविणारे आणि तेहि गेलीं वीस वर्षं—असे सखीचे लाल तुम्हींच मला प्रथम भेटलांत बुवा ! काय हो, हें सांगण्यास तुम्हास थोडीसुद्धा खंत वाटत नाही ? खोटं बोलण्यामुळं समाजाचं हित होतं, त्यांच्यांत सुधारणा होते, तर मग खोटं बोलूं नको तर काय करूं म्हणतां ?—तुमचं हें बोलणं ऐकून मला तर इतका संताप चढला आहे की, आत्ताच्या आत्ता तुम्हाला पोलिसांच्या स्वाधीन करावं. काय म्हणतां खुशाल करा—त्यांतील बरेच अधिकारी तुम्हाला चांगले ओळखतात आणि ते तुम्हाला तुरुंगांत पोंचविण्याऐवजी तुमच्या घरींच पोचवतील ! !

काय बेशरम आहांत हो तुम्ही ! तुम्ही तर पक्केच बेडर दिसतां मला. काय हो ? तुम्ही आपल्या घरच्या माणसांशींहि खोटं बोलतां ?—

प्रसंग पडला तर त्यांच्याशींहि खोटं बोलायला कमी करीत नाही ? एकदा तर बायकोशींच खोटं बोलण्याचा प्रसंग आला, त्यामुळं तुमचं दुसरं लग्न टळलं म्हणतां ?

अरे सद्गृहस्था ! मग तूं खरं तरी केव्हा बोलतोस ?—तसं पाहिलं तर खरं बोलण्याचं कामच पडत नाही. त्यामुळे असले प्रसंग फारच कमी येतात. त्यामुळे धंद्यांत प्रगति फार आणि लोकहि पण चाहतात खूप !

वारे वा ! हें तर तुम्ही खूपच सांगितलं. खोटं बोलणं हें पाप आहे असं नाही का तुम्हास वाटत ? लहानपणीं 'खोटं कधी बोलूं नये, कोणासंगें भांडूं नये' हें नाही का शिकलांत ?—शिकलांत पण पुढं खोटं बोललां तरच तुम्ही जगूं शकाल व इतरांनाहि जगवाल असं प्रत्ययास आलं म्हणतां, म्हणून खोटं बोलूं नको तर काय करूं ?

अरे, वर्धा स्टेशन आलं वाटतं ? म्हणजे इथंच उतरणार काय ? काय काम आहे ? मित्राकडं चाललांत ? म्हणजे आता त्याच्याशींहि खोटं बोलणार वाटतं ? काय, त्याच्या प्रकृतीवर अवलंबून आहे ? तो फार आजारी आहे ? त्याची नाडी पाहून नंतर खोटं बोलायचं की नाही तें ठरविणार म्हणतां ? वा ! वा ! नमस्कार डॉक्टरसाहेब, खूपच केली तुम्ही आमची आंगभर—अहो सुरवातीलाच सांगितलं असतं तर—तर काय प्रवास अगदीच रुक्ष गेला असता म्हणतां. वा ! वा ! धन्यवाद डॉक्टर—ईश्वर तुम्हास उदंड आयुष्य देवो ! !

तरुण भारत, नागपूर—दीपावली विशेषांक—१९५३.

* * *

## ११. मी अध्यक्ष होणार—?

काय हो बापुराव, आज कुणीकडं आलांत? बहुता दिसांत स्वारी इकडे फिरकलेली दिसते. आजच तुम्हाला आमची कशी काय आठवण झाली? कांहीं विशेषच असल्याशिवाय तुम्हाला आमच्या घराचा रस्ता एरव्ही कसा आठवणार! ताकाला जाऊन भांडं लपवण्यांत काय अर्थ बरं! बोला, स्पष्टच बोला काय काम आहे तें?

अहो भाऊराव, त्याचं असं की आता आपली वार्षिक निवडणूक जवळ आली ना? माझी इच्छा अध्यक्ष म्हणून उभं राहायची आहे. तसा मला माझ्या मित्रांचा पाठिंबाहि आहे. पण कांहीं थोडे लोक विरुद्ध दिसतात. पण त्यांचं काय? शेवटीं निकाल हा बहुमतावरच असणार ना? तें तर मी हुकमी मिळवीनच. त्याबद्दल खात्री असूं द्या. मला फक्त तुमच्याकडून आश्वासन व दुजोरा हवा. बोला, देतां का तो?

काय हो बापुराव, मला काय तुम्ही अगदीच बोळ्यानं दूध पिणारे समजला की काय? अहो, तुमचं अजून वयसुद्धा झालं नाही. तुम्हास पुष्कळ अवकाश आहे. तेव्हा तुम्ही एवढी घाई कां करतां? काय? प्रतिभा आटत चालली त्यामुळं पुढं अध्यक्ष होण्याचे Chances फार कमी वाटतात? वाहत्या गंगेंत हात धुऊन घेतलेला बरा?—अहो, पण ज्यांच्या गोवऱ्या मसणांत पोचल्या आहेत त्यांनी राम म्हटल्यावर नंतर त्यांच्या फोटोला अध्यक्ष करून काय माळ घालणार आहांत तुम्ही? अहो, तुमच्या या अशा स्वार्थी व आपलपोटेपणामुळेच तर संस्था रसातळाला पोचतात. जरा थोडा विचार तर करा. अगोदर जे ज्येष्ठ आणि श्रेष्ठ साहित्यिक आहेत त्यांचा नंबर लागून जाऊं द्या. मग आहांतच की तुम्ही!!

काय हो, मी कदाचित् ज्येष्ठ नसेन. पण मी काय कमी श्रेष्ठ आहे ? कैकांच्या वर नंबर लागेल. माझा तुम्ही काय समजलांत मला ? अजून तुम्हीं मला ओळखलं नाही. माझ्या Influence चा तुम्हास कल्पना नाही. मीं अनेक हुन्नरी माणूस आहे. आयुष्यांत माणसानं असे Chances जितक्या लौकर मिळवितां येतील तेवढे मिळविले पाहिजेत. आमच्या व्यसनामुळे आम्ही लौकरच आटोपलों तर काय आमच्या प्रतिमेला तुम्ही अध्यक्ष म्हणून निवडाल ? शुभस्य शीघ्रम् ! यद्दीर्घसूत्री विनश्यति ! ! तेंव्हा म्हटलं आपला नंबर कसंहि करून लावूनच टाकावा.

काय हो, तुम्ही आतापर्यंत डोळ्यांत भरण्यालायक कोणती कामगिरी केली ? चार लघुकथा लिहिणं आणि तीन पुस्तकं प्रकाशित करणं म्हणजे झालं का सर्व कांही ? लोक चाहतात का तुम्हाला ? हें नको का पहायला ? शिवाय ज्येष्ठ माणसांना बाजूला सारून तुम्हास कोण विचारणार कापूसकेवढ्या ? केवळ नुसता हट्ट म्हणून तुम्ही आपलं घोडं पुढं दामटणार काय ? हें तर उतावळा नवरा गुडघ्यास बाशिंग यासारखंच म्हणायचं. अहो, राखावीं बहुतांचीं अंतरें, भाग्य येतें तदनंतरें ! समजलांत ? तें कांही नाही. तुम्ही यंदा अध्यक्ष म्हणून मुळीच उभं राहूं नये असं मला प्रामाणिकपणं वाटतं. तुमच्या स्वतःच्या प्रतिष्ठेपेक्षा संस्थेची प्रतिष्ठा मला मोठी वाटते. खरं की नाही ? काय हो, असं आंबट तोंड कां करतां ? खरं काय तें मीं स्पष्टपणें बोललों. वाटल्यास तुम्ही मला वाईट म्हणा नाहीतर मनसोक्त शिव्या द्या. त्या मी ऐकायला तयार आहें. मीं आपलें स्पष्ट मत सांगितलें. इतक्या उपर ऐकावं जनाचं, करावं मनाचं, बरं का, ठीक आहे, नमस्कार—काय हो तोहि न घेतांच निघालांत ? बरं, मर्जी तुमची पण माणुसकी आमची बरं का ? लक्षांत ठेवा हिंदु हें !

# १२. आता हें काळं तोंड कुणाला दाखवूं?

कारटे, तुला काय कळतं यांतलं ? कांही जगांतला अनुभव आहे का व्यवहार तरी समजतो ? म्हणे मला नाही करायचं याच्याशीं लग्न. मग काय अशीच राहणार सडी जन्मभर ? बापाच्या पश्चात् लहानाचं मोठं केलं, बी. ए. पर्यंत शिकविलं तें गेलं एकीकडेच. आणि आता उलट मलाच अक्कल शिकवायला लागली. इतके स्वतंत्र विचारी होतां तर कशाला राहिला इतके दिवस मरायला माझ्या घरांत ? मिजास बादशहाची अन् अवलाद कैकाड्याची !

दादा, कशाला बोलतो इतका ? मी समजावतें तिला. बी. ए. झाली तरी अजून ती पोर आहे. ते गेल्यामुळे मामा या नात्यानं तिनं तुझ्याशीं बोलूं नये तर कुणाशीं ? तूं आमचा संभाळ केलास. त्यांचे पश्चात् आमचा गाडा चालविलास आणि मला व माझ्या या चार कच्च्याबच्च्यांना तूं संभाळलंस हे आमच्यावर काय कमी उपकार झालेत ? आमची तर काळीवर शेत नाही अन् पांढरीवर रेघ नाही अशी स्थिति. तूं जें कांही करशील तें आमच्या बऱ्यासाठीच. ठरव तिच्या लग्नाचा मुहूर्त म्हणजे तेवढाच माझ्यावरील एक भार तरी कमी होईल !

आई, तूं कोण राक्षसीण तर नाही ना ? त्या म्हाताऱ्याशीं लग्न लाव म्हणतेस मला ? असेल तो श्रीमंत. मला काय चाटायची त्याची श्रीमंती ? आता तो पन्नाशीच्या घरांत गेला आणि आतापर्यंत तीन बायका झाल्या. मामाला तरी कांही काळीज आहे की नाही ? आणि मलाहि माझ्या भावना—काय वाटेल तें झालं तरी मी लग्न करणार नाही. अशीच जन्मभर राहीन आणि नोकरी करून तुम्हां सर्वांचा सांभाळ करीन !

ताई, कुठं आहे मालू? पुढच्या आठवड्यांत ठरवली तिच्या लग्नाची तारीख— अरे पण दादा!—अरे-बिरे कांही नाही आणि मला तुमचं कांही एक ऐकायचंहि नाही. जें ठरलं तें ठरलं. आता माझ्या तोंडाला काळिमा मात्र लावूं नका म्हणजे झालं!

कोण? वाजंत्री आलेत—बरं, हाक मारा मालूला. आज हळदीचा दिवस. हळद लागायची तिला—काय मालूचा पत्ता नाही. काय म्हणतां? मागच्या विहिरींत मुलीचं प्रेत?—हायरे दैवा!!—कोण हा दुर्विलास?—आतां हें माझं काळं तोंड कुणास दाखवूं?

* * *

# १३. अहो, ती कुठे आहे ?

अहो, आठ दिवस झालेत् भाजी नाही घरांत—असं का. वरं बरं ! आणा पाहूं पैसे. हें काय ? ही तर दहा रुपयांची नोट. मोड नाही म्हणतां. ठीक आहे. असूं द्या. हें बघा, मी आता आलोंच भाजी घेऊन.

नमस्कार काकासाहेब. बरेच दिवसांत भेट नाही आपली. काय म्हणतां तुम्हीहि मंडईतच चाललांत—वा, वा, फारच छान. तुमच्या हिनं आज पिटाळलं इकडे म्हणतां.— काय हो ! आपल्या पुढे जात असलेले ते बापूसाहेबच ना ? अहो, बरेच महिन्यांत त्यांची भेट नाही.

नमस्कार बापूसाहेब—काय म्हणतां बरा भेटलों म्हणून. आज चहाची हुक्की आली म्हणतां—म्हणजे मी घरीं गेल्यावर बुक्की खाऊं काय ?—बरं, चला की जोगेश्वरींत. अरे, इथे तर नानासाहेबहि उभेच आहेत. ठीक ठीक ! ! चलाच तर मग सर्वजण—काय उन्हाळा म्हणून चहा नको म्हणतां—मग काय आइसक्रीम ?—बरं, त्याचे अगोदर गोड प्लेट, नंतर खारी प्लेट व शेवटीं आइसक्रीम घ्यायचं म्हणतां ? ठीक ठीक, मान्य—अहो मालक, आणा बरं हें सर्व !

काय आनंद झाला म्हणतां ? वा, वा, अलभ्य लाभ ! नमस्कार, नमस्कार अं ! !—पण काय हो नानासाहेब, बिल ? मीच देऊं म्हणतां ? बरं, बरं ! !

अहो हें काय ? हात हलवतच परत आलांत ? ती कुठे आहे ? काय, मंडईत गेलांच नाहीत ?—मित्रांबरोबर हॉटेलांत गेलांत आणि दहाहि रुपये खर्च केलेत ? अहो, पण मी ते भाजीसाठी दिले होते ना ?—काय सवय नसल्यामुळे विसरलांत ?—अहो, मंत्री होतां ना

तुम्ही ?—काय त्याचाच परिणाम आहे म्हणतां हा ?—म्हणजे काय बजेटमध्ये ज्या गोष्टीसाठी रकम मंजूर करण्यांत येई त्यावर ती कधीच खर्च होत नसे म्हणतां—आणि तरीहि मंत्री म्हणून शेवटपर्यंत मिरविलांत ?—काय म्हणतां तीच सवय खाजगी आयुष्यांत जडली—एका कामासाठी मंजूर झालेली रक्कम दुसऱ्याच कामावर खर्च करण्यांत येत असें म्हणतां !—नशीब तुमचं आणि दुर्दैव आमचं ! !

काय, आता यापुढं मंडईचं तोंड पाहण्याची पाळी येणार नाही म्हणतां ! वा, वा, किती धन्यवाद देऊं आपल्याला याबद्दल ? मग यापुढं ती नक्की आलीच म्हणून समजा ! काय आज चुलीला विश्रांति ?—म्हणजे काय ? ही अपराध्याला शिक्षा वाटतं ?—बरं झालं मी पुन्हा मंत्री निवडून नाही आलों तें. नाही तर कोण फजिती !! हो, द्वादशीच्याच दिवशीं शिवरात्र उगवायची. आपल्या पुढं तर कांही अपीलच नाही म्हणायची—हातच टेकावे लागणार आम्हाला—यापेक्षा तोफेच्या तोंडीं गेलेलं बरं—कारण आपल्या तोंडाशीं कुणी लागायचं ?

★ ★ ★

# १४. दे दान सुटे गिरान

'दे दान, सुटे गिरान! पैशा-अडक्याचं दान, गाईचं दान, वस्त्राचं दान, भू-दान, दे दान, सुटे गिरान!'—अरे राम राम, काय त्रास आहे बुवा? ऐन पहाटेच्या साखरझोपेच्या वेळीं अगदी भंडावून सोडलं या आवाजांनी—अरे, कोण आहे रे तिकडे? एक नवा पैसा आण पाहूं!

कोण, कोण रे तूं?—अरे, हा तर ओळखीचाच चेहरा दिसतो—हो नक्कीच—हा तर मन्याचा बाप आणि हातांत चौपदरी घेऊन सकाळचा ओरडतोय लेकाचा!—काय म्हणतोस, आरडा-ओरड करूं नका म्हणून?—अरे, मग तुझ्यासारख्याला झोळी घ्यायला व तीहि आजच्या दिवशीं—काय झालं? हळू बोलूं म्हणतोस—बरं, हें रे काय?—तुझ्या भिडस्तपणामुळं आणि मतलबी लेकांच्या हरामीपणामुळं सांपत्तिक स्थितीला केव्हाच ग्रहण लागलं म्हणतोस! प्रतिष्ठितपणाच्या नांवाखाली दिवसाढवळ्या भीक मागणंहि शक्य नाही, म्हणून पहाटेच्या अंधारांत इतरांबरोबर ओरडत आला म्हणतोस—पैशा-अडक्याचं थोडंसं दान द्याल तर आकाशांतील चंद्राचं ग्रहण सुटण्याऐवजी पृथ्वीवरील या प्रतिष्ठित मानवाच्या दारिद्र्याचं अंशतः तरी ग्रहण सुटेल म्हणतोस!—अरेरे, कोण ही दुर्दशा!!!

पण काय रे, तुझं ग्रहण सोडण्याच्या फंदांत मी काय स्वतःला ग्रहण लावून घेऊं?—काय म्हणतोस मी श्रीमंत आहे!—मग माझी श्रीमंती काय तुझ्यासाठी आहे? चल, हो चालता इथून—म्हणे दे दान, सुटे गिरान. तुझ्या बापानं कधी पाहिलं आहें का ग्रहण सुटलेलं?—काय म्हणतोस?—भुंकूं नकोस म्हणून!—अरे, वारे वा, कांही थोडी तरी लाज? चोराच्या उलट्या बोंबा—काय भीक नको

पण कुत्रा आवर म्हणतोस!—बरं, बरं, चल, चालता हो इथून! मिजास बादशहाची अन् अवलाद कैकाड्याची. लेकाचा चोर तर चोर आणि वर शिरजोर!!

कोण आहे रे तिकडे?—रामू, बंद कर रे फाटक आणि घाल त्याला कुलूप म्हणजे या चोरांचा उपद्रव तरी होणार नाही—काय म्हणालास रे रामू?—ग्रहण केव्हाच सुटलं म्हणून—स्नान करायला हवं लौकर, नाही तर कांहीच खातांपितां येणार नाही. पाणी काढलं आहे म्हणतोस—बरं, बरं, चहा घेऊन ये बघू अगोदर!!

'सुषमा' मासिक, जुलै १९५८

* * *

# १५. माझं हें असं आहे

नमस्कार भाऊसाहेब !— कसचा विचार करतो म्हणतां ?— अहो, माझ्या कांही गोष्टी ठरल्या आहेत. मी कधीं कोणाचेहिकडून उसनें आणीत नाहीं. कारण उधारीचं पोतं, सवा हात रितं. म्हणून ठरविलं कीं आयुष्यांत उधारी म्हणून ठेवायची नाहीं. आता परिस्थितीप्रमाणं सर्वच कांही बदलतं ही गोष्ट निराळी. अहो, राष्ट्रं बदलतात, पुढारी बदलतात, मंत्री बदलतात, नायका बदलतात, कायदे बदलतात, पुरुष बदलतात, फार काय अलीकडे निसर्गहि बदलूं लागला आहे. मग माझे विचारच कां बदलूं नयेत बरं ?

त्याचं असं झालं. एकदां मला दहा रुपयांचं काम पडलं म्हणून ओळखीच्या एका गृहस्थाकडे गेलों. पण काय म्हणतां ? बघला असेल तर शपथ !! मला भयंकर राग आला त्याचा. आणि त्या दिवसापासून मीं शपथ घेतली की, आयुष्यांत उधार किंवा उसनं म्हणून कांही आणायचं नाही !—पण आमची ही ! काय सांगूं ? नशीब माझं ?— अहो, घरांत अशी एकहि वस्तु नाही की, जी उसनी मागून आणली नाही ! आता सांगा माणसानं काय करावं ? माझं तर तत्त्व ठरलं आहे की कांही झालं तरी उधारउसनवार करायची नाही. कारण उसन्याचे गहूं पाहुण्याच्या किती कामावर पडणार ? पण शेवटीं नको तेंच गळ्यांत पडतं ! आता काय करावं ?

काय म्हणतां माझीं तत्त्वं मी सोडूं ? हें कसं शक्य आहे बरं ? माझी तर मोठीच पंचाईत होईल म्हणायची ! मागे आड आणि पुढे विहीर अशी माझी स्थिति व्हायची. पण मी आतां यावर एक रामबाण उपाय शोधून काढला आहे बघा ! तो असा की आयुष्यांत मी उधारउसनवार

केलें नाही आणि आमच्या हिचं तर त्यावाचून निभत नाही, तेव्हा म्हटलं हिच्याशींच काडीमोड करावा म्हणजे सारंच प्रकरण निकालांत निघेल. काय, ठीक आहे की नाही कल्पना!

अहो, ती रुपयाची मोड मागेल पोटगी म्हणून! मग घरांत तुम्ही सोडून जशा सर्व वस्तु उसन्या आणल्या तसा तुमच्याऐवजी दुसराच उसना म्हणून ती आणील की! म्हणजे शंभर टक्के उधारउसनवार पूर्ण!!—अरेच्या, ही तर खूपच झाली म्हणायची!

काय, माझं डोकं फिरलं म्हणतां? अहो, हें कसं शक्य आहे? आतापर्यंत मी ठाण्यास नसतों का पोचलों? अहो, माझं डोकं शाबूत आहे. फक्त माझीं तत्त्वंच माझ्या काबूंत नाहीत. मी इची आंगभर स्तुति करायला गेलों तर माझंच आंग भरून आलं! अहो, माझं हें असं असलं तरी हिच्यापुढं नमतं घेणं भाग आहे मला. आता काडीमोड गेली, रुपयाची मोडहि लपली. आता काय ती नागमोड समोर दिसते बरं का!—अहो, माझं हें असं आहे! काय सांगूं भाऊसाहेब तुम्हांला?

* * *

# अभिप्राय

. १ .

श्री. रा. पु. ऊर्फ तात्यासाहेब सगदेव यांना न ओळखणारा माणूस नागपुरांतील सुशिक्षित समाजांत क्वचितच आढळेल. त्यांच्या पाहुणचारा-इतकीच त्यांच्या विनोदी, मार्मिक व भेदक संभाषणाची चव घेण्यास सगळे-जण उत्सुक असतात. नाना व्यक्तींच्या स्वभावांतील खाचाखोचा, गुणदोष, दंभ आणि विसंगति यांचें बारीक निरीक्षण करूनहि सर्वांचें भलें चिंतणाऱ्या व करण्यास झटणाऱ्या या 'जगमैत्रा' ची ओळख नागपुराबाहेरील जनतेस होण्याचा योग त्यांच्या या नाटयछटांच्या योगानें येत आहे ही आनंदाची गोष्ट होय. मनुष्यस्वभावांतील दंभ, पोकळ बडेजाव, असहिष्णुता, आप-स्वार्थीपणा इत्यादि व्यंगें आणि तीं झाकण्याविषयीची त्याची धडपड या नाटयछटांमधून श्री. सगदेवांनी फार चांगल्या रीतीनें व्यक्त केली आहे. त्यांनी एकेकापुढे एकेक आरसाच धरला आहे असें म्हटलें तरी चालेल. सगदेवांची शैली प्रसादपूर्ण आहे; त्यांना सामाजिक आणि वैयक्तिक उपरोध चांगला साधला आहे. मराठी वाचकवर्गाकडून या नाट्यछटांचें चांगलें स्वागत होवो असें मी इच्छितों.

ता. ३–२–१९५९
पुणें ५

श्री. ना. बनहट्टी

. २ .

माझे मित्र श्री. तात्यासाहेब सगदेव यांनी लिहिलेल्या नाट्यछटा पुस्तकरूपाने प्रसिद्ध होत आहेत हें पाहून फार आनंद वाटला— आणि माझ्याप्रमाणेच तो वाचकांनाहि वाटेल अशी मी आशा बाळगतों. मराठींत 'नाट्यछटा' वाङ्मय अत्यल्प आहे. एक दिवाकर सोडले तर— 'अनामिका सार्थवती बभूव' असेंच म्हणण्याची पाळी येईल. या वाङ्मयप्रकाराचे प्रवर्तक व संवर्धक तेच. त्यांच्या मागून नांव घेण्यासारख्या नाट्यछटा लिहिल्या गेल्या नाहीत असें म्हटलें तर फारसें चुकीचें होणार नाही. अशा स्थितींत श्री. सगदेवांच्या या प्रकाशनामुळे आनंद होणें स्वाभाविक नाही काय?

श्री. तात्यासाहेब खरे साहित्यसेवक आणि रसिक आहेत. त्यांच्या स्वभावांत आणि नित्याच्या बोलण्या-चालण्यांत भरपूर नाट्य भरलेलें असतें. त्याचाच आविष्कार या नाट्यछटांच्या रूपाने झालेला आढळतो. संस्कृतमधील आकाशभाषित किंवा इंग्रजींतील ड्रॅमॅटिक मोनोलॉगचें स्वरूप नाट्यछटांना असतें, हें खरें. पण स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून ड्रॅमॅटिक मोनोलॉगचें जें महत्त्व आहे तें आकाशभाषिताला नाही. प्रत्यक्ष रंगभूमीवर नसलेल्या व्यक्तीचें भाषण जणु ऐकत आहोंत अशा आविर्भावाने 'काय म्हणतोस'— या शब्दांनी आरंभ करून आपणच म्हणावयाचें व संवाद करायचा एवढाच तांत्रिक प्रकार आकाशभाषितांत असतो. या तंत्राचा अवलंब करून संस्कृतमध्ये 'भाष' ग्रंथ निर्माण झाले आहेत, पण ते विस्ताराने मोठे आहेत. ड्रॅमॅटिक मोनोलॉग हा भापणासारखाच पण आकाराने फार लहान असतो. आकाशभाषिताच्या तंत्राचा अवलंब करून थोड्या मर्यादेंत भावनात्मक नाट्य ड्रॅमॅटिक मोनोलॉगमध्ये आढळतें. त्यांत विरोध, वैचित्र्यादिकांच्या साह्याने व्यक्तिदर्शन उत्कटतेने झालेले असतें. दिवाकरांच्या नाट्यछटांत हे सर्व गुण उतरलेले आहेत आणि म्हणून त्यांच्या नाट्यछटांनी मराठी वाङ्मयांत स्वतंत्र स्थान मिळविलें आहे.

यांतील अनेक गुणांचा आविष्कार तात्यांच्या या नाट्यछटांत झालेला आहे. तात्यांचें निरीक्षण सूक्ष्म असतें याचा आम्हाला नेहमीच प्रत्यय येतो.

त्यांतूनच मनुष्यस्वभावाचे निरनिराळे नमुने या नाट्यछटांत निर्माण झाले आहेत. मानवी स्वभावांतील हास्यास्पद विसंगति, धूर्तपणा, मूर्खपणा, दांभिकता, निराशा, इत्यादिकांचीं अनेक चित्रें येथे आढळतील. तीं चितारतांना तात्यांची कला अनेकदा आकाशभाषिताचें तंत्र व शाब्दिक कोट्या यांच्या भोवती रेंगाळत राहिल्यामुळे व्यक्तित्वाच्या उत्कटतेचा वेध घेऊनहि क्वचित् ती तेथपर्यंत पोचत नाही. तिच्यांत तें सामर्थ्य आहे याची जाणीव होते, पण त्या सामर्थ्याचा विकास व्हावयाचा आहे. या पुस्तकांतील कांही नाट्यछटांवरून त्यांच्या पुढील लेखनांत ते हळू हळू विकसित होत जाईल अशी मला खात्री वाटते.

आहे या स्वरूपांतहि प्रस्तुत नाट्यछटासंग्रह आपलें मनोरंजन करण्याला समर्थ आहे यात मात्र शंका नाही. तात्यांचा स्वभाव विनोदी असल्यामुळे त्यांच्या लेखणींतून बाहेर पडलेल्या नाट्यछटांचें स्वरूप प्रामुख्याने विनोदी असावें हें स्वाभाविक होय. मराठी वाङ्मयांत हा वाङ्मयप्रकार अद्याप चांगला पोसला गेला नाही. कारण आकाशभाषिताच्या तंत्राने उत्कट नाट्याची निर्मिति करून दाखविणें म्हणजे तांदळाच्या दाण्यावर कलाकुसर करण्याइतकेंच कठीण आहे. अशा या प्रांतांत अत्यंत धिटाईने पावलें टाकल्याबद्दल मी तात्या-साहेबांचे मनःपूर्वक अभिनंदन करतों आणि त्यांच्या कलेचा योग्य तो विकास होऊन या वाङ्मयप्रकाराची भरीव सेवा त्यांच्याकडून घडो अशी इच्छा प्रगट करतों.

‘ उषःकाल, ’
नवी रामदास पेठ, नागपूर १
ता. १५ जानेवारी १९५९

वि. भि. कोलते

. २ .

माझे परम मित्र श्रीयुत राजाराम पुरुषोत्तम उपाख्य तात्यासाहेब सगदेव यांच्या मोजक्या 'नाट्यछटां'चा हा संग्रह आज प्रसिद्ध होत आहे. या संग्रहांतील नाट्यछटा पूर्वी तरुण भारत, महाराष्ट्र, समाधान, मधुवन, सुषमा इत्यादि नियतकालिकांतून प्रकाशित झाल्या होत्या. आता त्या एकत्र मुद्रित झाल्यामुळे त्यांना विखुरलेल्या पुष्पांचा जसा गुलदस्ता सिद्ध करावा तसें सुंदर स्वरूप प्राप्त झालें आहे. पुष्पाचें अंतरंग जरी एक असलें, तरी त्यांच्या बहिरंगांत जशी आकारांची व रंगांची विविधता असते तशीच या 'नाट्यछटां'तहि मनुष्यस्वभावाच्या निरनिराळ्या नमुन्यांची विविधता आहे. त्यामुळे त्या वाचतांना वाचकांना तोचतोपणा जाणवणार नाही की कंटाळा वाटणार नाही.

श्री. सगदेव यांचा पिंड मुळांत साहित्यिकाचा आहे. हाडाने ते रसिक आहेत. त्यांच्या सहवासांत ज्यांची सवड जाते त्यांना त्यांच्या या स्वभावाची प्रतीति आल्याशिवाय राहात नाही. ते जात्याच समाजशील आहेत. दुसऱ्यांच्या उपयोगी पडावयाचें, सार्वजनिक कार्यांत हिरीरीने समभागी व्हावयाचे, स्वतः हसावयाचे आणि इतरांस हसवावयाचें हा त्यांचा स्वभाव आहे. त्यामुळे त्यांचा अनेक माणसांशीं संबंध येतो. स्वतः सगदेव हे सामाजिक कार्यकर्ते असल्यामुळे भिन्न भिन्न संस्थांशीं त्यांचा कोणत्या ना कोणत्या तरी नात्याने संबंध येतो. त्याचा एक परिणाम असा झाला आहे की, श्री. सगदेव यांनी अनेक व्यक्तींना अगदी जवळून न्याहाळून पाहिलें आहे. त्या व्यक्तींच्या स्वभावाची त्यांना ओळख व पारख आहे. 'जितक्या व्यक्ति तितक्या प्रकृति' हें त्रिकालाबाधित तत्त्व जसें सगदेवांच्या अनुभवाला आलें आहे. तसें तें फारच थोड्या लोकांच्या अनुभवास आलें असेल. आपल्या या अनुभवाचा सगदेवांनी या 'नाट्यछटां'त मोठा समुचित उपयोग करून घेतला आहे.

'नाट्यछटा' या नांवावरूनच तिच्यांत 'नाट्य' हें आद्य हवें हें स्पष्ट होईल. पुन्हा हें 'नाट्य' जी व्यक्ति करील, तिच्या हावभावांत व बोलण्यांत तिचा स्वभाव व्यक्त होणें आवश्यक आहे. हा स्वभाव सर्व-

साधारणांसारखा असला, तरी त्याचा कांहीएक ' विशेष ' पाहिजे. हा ' विशेष ' नाटयछटेंत ठळक रीतीने उघड झाला पाहिजे. बहुतेक मनुष्यांचा स्वभाव विसंगतीने भरला आहे. बोलावयाचें एक आणि करावयाचें दुसरेंच. बोलणें आणि चालणें यांत एकवाक्यता नसावयाची. पोटांत एक आणि ओठांत भलतेंच. खायचे दांत वेगळे आणि दाखवावयाचे वेगळे. ही स्वभावांतली विसंगति ' नाटयछटें'त प्रकट झाली म्हणजे वाचकाला हसूं येतें. ' नाटयछटा ' ही हास्यकारक असावी असा कांही नियम नाही. ती करुणहि असूं शकते. परंतु या संग्रहांतील सर्वच ' छटा ' हास्यकारक आहेत कारण श्री. सगदेव यांची वृत्ति त्या रसाला अनुकूल आहे. ' नाटयछटा ' करुण असो की हास्यकारक असो, ती निर्माण करणारा साहित्यिक सहानुभवी असला पाहिजे. ज्या व्यक्तीच्या स्वभावाचें तो निदर्शन व प्रदर्शन करीत असतो, त्या व्यक्तीबद्दल त्याला सहानुभूति हवी. ती जर नसेल, तर त्याची ' नाट्यछटा ' अयशस्वी होईल. अतिशय आनंदाची गोष्ट आहे की, श्री. सगदेव यांच्या ' नाटयछटा ' यशस्वी झाल्या आहेत.

' नाटयछटां'साठी सगदेवांनी जे प्रसंग निवडले आहेत ते मुळांत नाटय-पूर्ण आहेत. ' नाटयछटें'तील पात्राकरिता त्यांनी जीं ' स्वगतें ' लिहिलीं आहेत, तीं चतुर, चटकदार व चुरचुरीत आहेत. सगदेवांची भाषा लवचिक आहे. जसा प्रसंग तशी ती कमी अधिक नाजुक, कठोर, सरळ व छद्‌मी उतरली आहे. तिच्यांत कृत्रिमता नाही. तिचा ओघ अव्याहत व स्वच्छंद आहे. त्यामुळे ती वाचतांना अडखळल्यासारखें वाटत नाही.

श्री. सगदेव यांच्या या ' नाटयछटां'त जिवंतपणाचा गुण फार मोठा आहे. त्यांतलीं पात्रें प्रत्यक्ष हालचाल करतांना दिसतात. सगदेव त्यांना नाचवत नाहीत. तीं स्वतः नाचतात आणि हसतात. मला वाटतें, कदाचित् हीं काल्पनिक पात्रें निर्माण करतांना त्यांच्या अंतश्चक्षूंपुढे कांही वास्तव व्यक्ति असाव्यात. सगदेवांच्या कलाचातुरीमुळे त्यांची पुरेपूर ओळख पटणें शक्य नाही. परंतु ' नाटयछटा ' लिहितांना सगदेव त्या ' सत्य ' व ' काल्पनिक ' यांच्या मिश्रणांतून उत्पन्न झालेल्या ' कलामूर्तीं ' शीं तदाकार झाले होते यांत कांही संशय नाही.

. २ .

माझे परम मित्र श्रीयुत राजाराम पुरुषोत्तम उपाख्य तात्यासाहेब सगदेव यांच्या मोजक्या 'नाट्यछटां'चा हा संग्रह आज प्रसिद्ध होत आहे. या संग्रहांतील नाट्यछटा पूर्वी तरुण भारत, महाराष्ट्र, समाधान, मधुवन, सुषमा इत्यादि नियतकालिकांतून प्रकाशित झाल्या होत्या. आता त्या एकत्र मुद्रित झाल्यामुळे त्यांना विखुरलेल्या पुष्पांचा जसा गुलदस्ता सिद्ध करावा तसें सुंदर स्वरूप प्राप्त झालें आहे. पुष्पाचें अंतरंग जरी एक असलें, तरी त्यांच्या बहिरंगांत जशी आकारांची व रंगांची विविधता असते तशीच या 'नाट्यछटां'तहि मनुष्यस्वभावाच्या निरनिराळ्या नमुन्यांची विविधता आहे. त्यामुळे त्या वाचतांना वाचकांना तोचतोपणा जाणवणार नाही की कंटाळा वाटणार नाही.

श्री. सगदेव यांचा पिंड मुळांत साहित्यिकाचा आहे. हाडाने ते रसिक आहेत. त्यांच्या सहवासांत ज्यांची सवड जाते त्यांना त्यांच्या या स्वभावाची प्रतीति आल्याशिवाय राहात नाही. ते जात्याच समाजशील आहेत. दुसऱ्यांच्या उपयोगी पडावयाचें, सार्वजनिक कार्यांत हिरीरीने समभागी व्हावयाचें, स्वत: हसावयाचें आणि इतरांस हसवावयाचें हा त्यांचा स्वभाव आहे. त्यामुळे त्यांचा अनेक माणसांशीं संबंध येतो. स्वत: सगदेव हे सामाजिक कार्यकर्ते असल्यामुळे भिन्न भिन्न संस्थांशीं त्यांचा कोणत्या ना कोणत्या तरी नात्याने संबंध येतो. त्याचा एक परिणाम असा झाला आहे की, श्री. सगदेव यांनी अनेक व्यक्तींना अगदी जवळून न्याहाळून पाहिलें आहे. त्या व्यक्तींच्या स्वभावाची त्यांना ओळख व पारख आहे. 'जितक्या व्यक्ति तितक्या प्रकृति' हें त्रिकालाबाधित तत्त्व जसें सगदेवांच्या अनुभवाला आलें आहे. तसें तें फारच थोड्या लोकांच्या अनुभवास आलें असेल. आपल्या या अनुभवाचा सगदेवांनी या 'नाट्यछटां'त मोठा समुचित उपयोग करून घेतला आहे.

'नाट्यछटा' या नांवावरूनच तिच्यांत 'नाट्य' हें आद्य हवें हें स्पष्ट होईल. पुन्हा हें 'नाट्य' जी व्यक्ति करील, तिच्या हावभावांत व बोलण्यांत तिचा स्वभाव व्यक्त होणें आवश्यक आहे. हा स्वभाव सर्व-

साधारणांसारखा असला, तरी त्याचा कांहीएक ' विशेष ' पाहिजे. हा ' विशेष ' नाटयछटेंत ठळक रीतीने उघड झाला पाहिजे. बहुतेक मनुष्यांचा स्वभाव विसंगतीने भरला आहे. बोलावयाचें एक आणि करावयाचें दुसरेंच. बोलणें आणि चालणें यांत एकवाक्यता नसावयाची. पोटांत एक आणि ओठांत भलतेंच. खायचे दांत वेगळे आणि दाखवावयाचे वेगळे. ही स्वभावांतली विसंगति ' नाटयछटें'त प्रकट झाली म्हणजे वाचकाला हसूं येतें. ' नाटयछटा ' ही हास्यकारक असावी असा कांही नियम नाही. ती करुणहि असूं शकते. परंतु या संग्रहांतील सर्वच ' छटा ' हास्यकारक आहेत कारण श्री. सगदेव यांची वृत्ति त्या रसाला अनुकूल आहे. ' नाटयछटा ' करुण असो की हास्यकारक असो, ती निर्माण करणारा साहित्यिक सहानुभवी असला पाहिजे. ज्या व्यक्तीच्या स्वभावाचें तो निदर्शन व प्रदर्शन करीत असतो, त्या व्यक्तीबद्दल त्याला सहानुभूति हवी. ती जर नसेल, तर त्याची ' नाट्यछटा ' अयशस्वी होईल. अतिशय आनंदाची गोष्ट आहे की, श्री. सगदेव यांच्या ' नाटयछटा ' यशस्वी झाल्या आहेत.

' नाटयछटां'साठी सगदेवांनी जे प्रसंग निवडले आहेत ते मुळांत नाटय-पूर्ण आहेत. ' नाटयछटें'तील पात्राकरिता त्यांनी जीं ' स्वगतें ' लिहिलीं आहेत, तीं चतुर, चटकदार व चुरचुरीत आहेत. सगदेवांची भाषा लवचिक आहे. जसा प्रसंग तशी ती कमी अधिक नाजुक, कठोर, सरळ व छद्मी उतरली आहे. तिच्यांत कृत्रिमता नाही. तिचा ओघ अव्याहत व स्वच्छंद आहे. त्यामुळे ती वाचतांना अडखळल्यासारखें वाटत नाही.

श्री. सगदेव यांच्या या ' नाटयछटां'त जिवंतपणाचा गुण फार मोठा आहे. त्यांतलीं पात्रें प्रत्यक्ष हालचाल करतांना दिसतात. सगदेव त्यांना नाचवत नाहीत. तीं स्वतः नाचतात आणि हसतात. मला वाटतें, कदाचित् हीं काल्पनिक पात्रें निर्माण करतांना त्यांच्या अंतश्चक्षूंपुढे कांही वास्तव व्यक्ति असाव्यात. सगदेवांच्या कलाचातुरीमुळे त्यांची पुरेपूर ओळख पटणें शक्य नाही. परंतु ' नाटयछटा ' लिहितांना सगदेव त्या ' सत्य ' व ' काल्पनिक ' यांच्या मिश्रणांतून उत्पन्न झालेल्या ' कलामूर्तीं ' शीं तदाकार झाले होते यांत कांही संशय नाही.

श्री. सगदेव यांच्या लेखनांतून अशाच कलापूर्ण 'नाटयछटा' बाहेर पडोत आणि मराठी वाङ्मय समृद्ध होवो !

श्रीधर सदन—श्रद्धानंद नगर
दक्षिण अंबाझरी मार्ग
नागपूर—अजनी
बुधवार ७—१—५९

भवानीशंकर पंडित


. ४ .

उत्तम नाटयछटा लिहिण्यास मनुष्यस्वभावाचें सूक्ष्म ज्ञान पाहिजे. विशेषत: मानवी स्वभावांतलीं गमतीचीं व्यंगें—मनुष्याचा अहंकार, दंभ, मोह, भीति, लाचारी, खोटेपणा, अगतिकता, स्वसमर्थनाची वृत्ति—यांचें ज्ञान तर हवेंच; पण या व्यंगांकडे जितक्या खेळकरपणें तितक्याच सहानुभूतीने पाहण्याचें कसबहि त्याला साधलें पाहिजे. थोडक्यांत म्हणजे नाटयछटाकार हा कसा व्यवहारचतुर, हरहुन्नरी, मनकवडा, धडपड्या आणि बहिर्मुख प्रकृतीचा हवा !

नागपूरचे नाट्यछटाकार श्री. रा. पु. सगदेव, हे मराठीचे एम्. ए. असून जीवनाच्या नाना क्षेत्रात रमलेले एक कर्तृत्ववान् साहित्यिक असल्यामुळे त्यांचा भिन्न भिन्न संस्थांच्या निमित्ताने असंख्य व्यक्तींशीं संबंध आलेला आहे. ते जितके मनमोकळे आहेत, तितकाच त्यांचा मित्रपरिवार अफाट आहे. जीवन-कलहाला ते कधी हटले नाहीत, त्यांच्या कोषांत अशक्य हा शब्द नाही, सज्जन आणि दुर्जन यांचा ते सारख्याच आतिथ्यानें सत्कार करतात, पण ते दुर्जनाला अधिक ओळखतात. त्यांची विस्मरणशक्ति चांगली असल्यामुळे दुर्जनांचाहि ते फायदा करून देतात. त्यांच्याजवळ जबाबाशिवाय प्रश्न नाही. अर्थात् ते तत्त्वज्ञानी नाहीत. मनुष्यस्वभाव ही त्यांना गुंतागुंत कधीच वाटली नाही—अर्थात् ते कथाकार नाहीत. एकाच विषयाच्या नादांत ते आजवर कधी रंगून वा गुंगून गेले नाहीत. मग अशा रम्य वेडाशिवाय ते 'कवि' कसे होणार ? त्यांना सतत असंबद्ध बोलण्याची सवय नाही. त्यामुळे ते लघुनिबंध लिहूं शकले नाहीत. कोटि केल्याशिवाय तें

शब्ददेखील खाली पडूं देत नाहीत. अशा कोटग्या शब्दांनी ते निबंध-प्रबंध कसे सजविणार ? त्यांच्या भोवती मोठमोठ्या साहित्यिकांची इतकी गर्दी असते की, एकान्ताच्या अभावीं त्यांना एखादा प्रसिद्ध वाङ्मय-प्रकार हाताळणें शक्यहि झालें नसावें. अर्थात् श्री. सगदेव सगळया जनांत असले तरी खुद्द त्यांच्या मनांत कांहीच राहिलें नाही !—आणि म्हणूनच ते सहवासांत येणाऱ्या प्रत्येक व्यक्तीकडे स्वनिरपेक्ष अशा बहिर्मुख दृष्टीने पाहूं शकले व मनुष्यस्वभावांतलें चेतोहारि नाट्य त्यांना दिसूं शकलें. नाट्याच्या विविध छटा ते मार्मिकपणाने कागदावर उमटवूं शकले यांतलें मर्म हेंच होय.

नाट्याशीं नाट्यछटेचा अगदी निकटचा संबंध आहे—




लोकचरित्र हें त्रैगुण्योद्भव आहे. त्यांतील सत्त्व आणि तमोगुण हे विशेषें-करून नाट्यकृतींत दिसून येतात. परंतु नाट्यछटेंत रजोगुणासच प्राधान्य आहे. कारण तींत अति सुष्ट वा अति दुष्ट माणसाच्या आत्यंतिक गुण-दोषांपेक्षा सामान्य व्यक्तीच्या क्षुल्लक दोषावर उपरोधाने पण उपहास न करतां, हळुवारपणें ओरखडा काढलेला असतो. अर्थात् अशा नाट्यक्षतांनीं कोणी व्यथित होत नाही ! साहित्यशास्त्राच्या दृष्टीने पाहावयाचें म्हणजे प्रत्येक नाट्यछटा हा ध्वनीचा प्रकार असून त्यांत कोणती ना कोणती अर्थचमत्कृति ध्वनित झालेली असल्यामुळे ‘ अलंकारध्वनि ’ हा नाट्यछटेचा आत्मा होय.

‘वदतो व्याघात’ वा ‘विरोधाभास’ या अलंकारांचा श्री. सगदेव यांनी प्रामुख्याने उपयोग केला असून ‘डोळ्यांनी दिसत नाही माझ्या’ म्हणून प्रत्येक बारीक वस्तूवर कडक नजर ठेवणाऱ्या ‘अण्णासाहेबांच्या आई,’ ‘मलाहि रागावतां येतं !’ म्हणतां म्हणतां कधीहि न रागावणारे “चौथ्या कुटुंबाचे यजमान,’ ‘नागपंचमी’च्या दिवशीं कणकीच्या सापाला दूध व खऱ्या सापाला सोटे लगावणारे ‘बाळाचे वडील’ यांच्या स्वभाव-छटेंत विरोधाभासाचाच ध्वनि प्रमुख नाही काय ? ‘अठरा लाख,’ ‘साभार परत,’ ‘मी कमावतें आहे’ यांतील अनपेक्षितपणा हीहि एक अर्थालंकाराचीच छटा आहे. अर्थात् या अलंकारध्वनीचें पर्यवसान हास्य-रसांत व्हावयाचें असलें तरी नाट्यछटेंतील रससामग्री ही रसाचा परिपोष होण्यास अपर्याप्त असल्यामुळे तिला हास्यरसाचीहि ‘छटा’ म्हणणेंच श्रेयस्कर.

आधुनिक मराठी वाङ्मयप्रकारांतील ‘दिवाकरां’नी भूषविलेलें हें नाट्य-छटेचें नवें लेणें श्री. रा. पु. सगदेव यांनी मोठ्या कुशलतेने हाताळलें असून त्यांच्या ठिकाणीं असलेल्या गुणसमुदायामुळे त्यांच्या हातून ‘नाट्यछटे’ला केवळ छटेलपणा न येतां एक प्रतिष्ठित व हृद्य स्वरूप मिळालें आहे. श्री. तात्यासाहेब यांनी याच दिशेने आणखी लांबवरचा मार्ग आक्रमावा व अशाच एकामागून एक भरदार नाट्यछटा लिहाव्या अशी स्नेहभावाने सूचना करून त्यांचें अभिनंदन करतों.

माधव गोपाळ देशमुख
अमरावती

नगर ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ३००९१
विभाग ...
क्रमांक २२७
नों. दि. ...

· ५ ·

माझे एक साहित्यप्रेमी मित्र श्रीयुत रा. पु. सगदेव, यांच्या तरुण भारत, महाराष्ट्र, सुषमा इत्यादि नियतकालिकांतून प्रसिद्ध झालेल्या नाट्यछटा एकत्रित करून या पुस्तकांत छापलेल्या आहेत. अलीकडे नाट्यछटा हा वाङ्मयप्रकार बराच दुर्मिळ झालेला आहे. चांगल्या नांवाजलेल्या मासिकांतून आजकाल नाट्यछटा प्रसिद्ध होतांना दिसत नाहीत. साहाजिकच अशा या उपेक्षित वाङ्मयप्रकाराला उचलून धरण्यांत आणि त्याच्या निर्मितीला सक्रिय हातभार लावण्यांत श्री. सगदेव यांनी निःसंशय योजकता दाखविली आहे, असें म्हणावें लागतें. पुन्हा, श्री. सगदेवांचा सार्वजनिक जीवनाचा अनुभव बराच मोठा असल्यामुळे मनुष्यस्वभावांतल्या निरनिराळ्या गमतींचें त्यांनी अगदी जवळून दर्शन घेतलें आहे, आणि मनुष्यस्वभावाचा हाच आपला अनुभव त्यांनी या नाट्यछटांच्या माध्यमांतून मांडला आहे. नाट्यछटा-रचनेचेंच असें एक तंत्र सांगतां येण्यासारखें आहे. श्री. सगदेवांनी त्या तंत्रांत नवें वळण कसें आणलें आहे आणि त्याच्या उपयोगांत कसा लवचिकपणा दाखविला आहे हें पाहण्यासारखें आहे. श्रीयुत सगदेवांचें अनुभव-भाण्डार अधिक समृद्ध होत जाईल आणि त्यांच्या अभिव्यक्तींत अधिक नाट्यात्मकता आणि कलात्मकता येत जाईल अशी अपेक्षा आहे.

अ. ना. देशपांडे
नागपूर

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
नों
वा. क
वि.
अनुक्रम ३०७९
विभाग
क्रमांक २२५९
नों. दि.
वाचनालय शाखा.